# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.१४ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## लेफ्टनंट जनरल धीरज सेठ नवे लष्करप्रमुख



नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)– लेफ्टनंट जनरल धीरज सेठ आता देशाचे नवे 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ' अर्थात लष्करप्रमुख असणार आहेत. शनिवारी सरकारने यासंदर्भात घोषणा केली. सेठ ३० जूनपासून या पदाचा कार्यभार स्वीकारतील. राष्ट्रपतींच्या अनुमतीने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची ३० जून पासून चीफ ऑफ आर्मी स्टाफपदी नियुक्ती करण्यात येत आहे. व्हाईस जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून ते पदभार स्वीकारतील असं संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. लेफ्टनंट सेठी सध्या व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ पदावर कार्यरत आहेत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. लेफ्टनंट सेठ हे पुण्याजवळच्या खडकवासला इथल्या नॅशनल डिफेन्स अकादमीचे विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये ते लष्करात रुजू झाले. संघटनात्मक काम, क्षमता विकास प्रशिक्षण, डावपेचात्मक असा ४० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव सेठ यांच्याकडे आहे. सेठ यांनी विविध स्वरुपाच्या मोहिमांचं नेतृत्व केलं आहे. वाळवंटी भागात तसंच भारत–पाकिस्तान सीमेचं रक्षण करणाऱ्या वेस्टर्न थिएटर कमांडचं नेतृत्व त्यांनी केलं आहे. लेफ्टनंट जनरल म्हणून त्यांनी सुदर्शन चक्र कॉर्प्स या भारतीय लष्करातील अतिशय प्रतिष्ठेच्या चमूचं नेतृत्व केलं. राजधानी दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय लष्करी कार्यक्रमांचं समन्वयन तसंच संचालन त्यांच्या नेतृत्वात झालं होतं.

# भारतीय हवाई दलाचे विमान कोसळले, ५ जवानांना वीरमरण

## को–पायलट बचावला, उपचार सुरु; भारतीय वायू दलाकडून 'कोर्ट ऑफ इन्क्वायरी'चे आदेश



गुवाहाटी दि.१३ (वृत्तसंस्था)– आसामच्या जोरहाट एअरबेसवर भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाला. एअरबेसवर लँडिंग करत असताना हवाई दलाचं एएन–३२ कार्गो विमान क्रॅश झालं. या घटनेत विमानाचे दोन तुकडे आहेत. या दुर्घटनेत भारतीय हवाई दलाच्या ५ जवानांना वीरमरण आलं. या घटनेत या विमानातील को पायलट बचावले आहेत मात्र त्यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. भारतीय हवाई दलाकडून तातडीनं या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

या अपघातात स्काड्रन लीडर प्रशांत सिंह, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जेंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर वायू खेमाराम कुमावत, अग्निवीर वायू दानिश आलम या भारतीय हवाई दलाच्या जवानांना वीरमरण आले आहे.

या अपघाताप्रकरणी भारतीय वायू दलाने 'कोर्ट ऑफ इन्क्वायरी'चे आदेश दिले आहे. अपघात का झाला याचे नेमके कारण तपासण्यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत. विमानाला आग का लागली याचा तपास यंत्रणा शोध घेत आहेत.

भारतीय हवाई दलानं प्रसिद्धीस दिलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात या दुर्घटनेत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या दु:खाच्या प्रसंगात भारतीय हवाई दल तुमच्या कुटुंबासोबत उभ असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे.

भारतीय हवाई दलानं या घटनेचं गांभीर्य लक्षात घेता भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी सुरु केली आहे. ही दुर्घटना कोणत्या कारणामुळं झाली याची चौकशी करण्यात येईल. जोरहाट एअरबेस जवळ विमान कशामुळं क्रॅश झालं. तांत्रिक समस्या निर्माण झाली की इंजिन फेल झालं याची चौकशी केली जाईल. याशिवाय खराब हवामानामुळं हा अपघात घडला असावा का या बाजूनं देखील चौकशी केली जाईल. भारतीय हवाई दलानं कोर्ट ऑफ इनक्वायरीचे आदेश दिले आहेत. या अपघातात को पायलट बचावला असून या चौकशीत त्याची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कारण तो अपघातावेळी कॉकपिटमध्ये होता.

भारतीय हवाई दलात एएन–३२ विमान गेल्या चार दशकांपासून महत्त्वाची भूमिका पार पाडतंय. कारगील युद्धापासून बचावकार्य राबवण्यामध्ये या विमानाची महत्त्वाची भूमिका होता. यापूर्वी देखील हे विमान क्रॅश झालं आहे.भारताच्या गरजा लक्षात घेऊन रशियाकडून एंतोनोव डिझाईन ब्यूरोकडून तयार करण्यात आलं आहे. ईशान्य भारतातील आसाम, अरुणाचल प्रदेशातील पर्वतीय आणि दुर्गम भागापासून ते सियाचीन आणि लडाखच्या दुर्गम भागात भारतीय सैन्याला रसद पोहोचवण्यात या विमानानं महत्त्वाची भूमिका बचावली आहेत. भारतीय हवाई दलात एएन–३२ विमान १९८४ मध्ये दाखल झोलं होतं.

# आमच्याशी कुणी संपर्कच केला नाही

## विलीनीकरणाच्या चर्चांवर सुप्रिया सुळेंचा खुलासा

नागपूर दि.१३ (प्रतिनिधी)– राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांनी राज्याच्या राजकारणात खळबळ उडवली असतानाच खासदार सुप्रिया सुळे यांनी या सर्व चर्चांना स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, ''विलीनीकरणाबाबत आमच्याशी कुणीही संपर्क केलेला नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही.''

यावेळी त्यांनी भाजपवरही जोरदार टीका करत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्याचा आरोप केला. तसेच शेतकरी, अर्थव्यवस्था आणि विरोधकांच्या एकजुटीबाबतही त्यांनी सविस्तर भूमिका मांडली.

विरोधी पक्षांतील फुटीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सुळे म्हणाल्या की, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. मात्र गेल्या काही वर्षांत विरोधी पक्षांना लक्ष्य केले जात आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलेल्या विधानाबाबत विचारले असता सुळे म्हणाल्या की, त्यांनी ना ते विधान ऐकले आहे ना वाचले आहे.

अमरावती विभागातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत विचारले असता सुळे यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर टीका केली. त्यांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी त्यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांची भेट घेऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा केली होती. मात्र त्यानंतर कोणतीही ठोस दिलासादायक घोषणा झालेली नाही. ''कर्जमाफी सरसकट व्हावी ही आमची भूमिका आहे. बळीराजा प्रचंड अडचणीत आहे.''

त्या पुढे म्हणाल्या, ''देशाची आर्थिक परिस्थितीही चिंताजनक आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून आर्थिक संकटावर चर्चा करावी.''

देशाच्या आर्थिक परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना सुळे म्हणाल्या की, वाढती महागाई, बेरोजगारी आणि शेतीतील संकट यामुळे सामान्य नागरिक अडचणीत आहेत. ''राजकारण सुरूच राहील. पण आर्थिक कंबरड ज्या पद्धतीने मोडत चाललं आहे, त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.'' त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारने आर्थिक विषयावर व्यापक चर्चा घडवून आणावी, अशी मागणीही केली. ठाकरे गटातील खासदार शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना सुळे म्हणाल्या, ''दीड–दोन वर्षांपासून हेच ऐकत आहोत. आता कान पकले आहेत. काहीतरी नवीन विचारा.'' त्यांच्या या उत्तरामुळे पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला. नागपूर विधान परिषदेत भाजपच्या पाठिंब्याने निवडून आलेले उद्योगपती अरुण लखाणी हे सुप्रिया सुळे यांचे व्याही आहेत. याबाबत विचारले असता त्यांनी कौटुंबिक वातावरणाची माहिती दिली. ''आज त्यांची भेट होणार नाही. मी अमरावतीला जात आहे. पण लग्नाला आता काहीच दिवस उरले आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसांत रोजच भेट होणार आहे.'' त्या पुढे म्हणाल्या की, दोन्ही कुटुंबांमध्ये लग्नाची लगबग सुरू झाली असून १६ जूनपासून विविध कार्यक्रमांना सुरुवात होणार आहे.

## एकनाथ शिंदे ठरवतील, त्या दिवशी ऑपरेशन टायगर पूर्ण होणार; केंद्रीय मंत्री प्रताप जाधवांचा दावा

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)– महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाचे काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा वारंवार पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर आता शिवसेनेचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी एक मोठा दावा केला आहे. ''ऑपरेशन टायगर आता अंतिम टप्प्यात पोहोचले असून ते पूर्णत्वाकडे गेले आहे. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब ज्या दिवशी योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील, त्या दिवशी हे ऑपरेशन पूर्ण होईल,'' अशी माहिती प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. त्यांच्या या विधानामुळे ठाकरे गटात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव येथे एका हर्बल फार्मा कंपनीच्या उद्घाटन सोहळ्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हा दावा केला आहे. जाधव पुढे म्हणाले की, ''या ऑपरेशनबाबत स्वत: उबाठाचे नेते आणि माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अप्रत्यक्षपणे कबुली दिली आहे. त्यामुळे आता आम्हाला यावर अधिक काही बोलण्याची आवश्यकता राहिलेली नाही,'' असे देखील त्यांनी म्हटले आहे.

## रोहित पवारांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस; साखर कमी झाल्याने प्रकृती खालावली

पंढरपूर दि.१३ (प्रतिनिधी)– पंढरपुरातील अन्नत्याग आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. कृषी मंत्र्यांकडून चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी कर्जमाफीतील जाचक अटी हटवून सर्व शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची विनाअट कर्जमाफी जाहीर झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, रोहित पवार यांची प्रकृती खालावली असून, त्यांच्या रक्तातील साखर कमी झाल्याने त्यांना अशक्तपणा आला आहे. डॉक्टरांनी रोहित पवारांना विश्रांतीचा सल्ला दिलाय.

''माझे वडील, पत्नी आणि मुलं भावुक झाली आहेत. मुलं बाबा लवकर घरी या असा निरोप देत आहेत, पण अन्नदात्याच्या न्यायासाठीचा हा लढा आता थांबणार नाही, असे रोहित पवार म्हणाले. मनोज जरांगे यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे नेते आणि इतर पक्षांचे नेते आंदोलनस्थळी येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शक्तिपीठ महामार्गासाठी हजारो कोटी रुपये खर्च करता, मग शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अटी का? असा सवाल करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

पंढरपुरातील अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या मागण्यांची राज्य सरकारने दखल घेतल्याचे संकेत कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी दिले आहेत. रोहित पवार यांच्याशी दोन वेळा फोनवरुन चर्चा झाल्याचे सांगत भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही याबाबत चर्चा झाल्याची माहिती दिली. रोहित पवार यांच्या कर्जमाफीसंदर्भातील मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मंगळवारी बैठक बोलावण्यात आली असून त्यातून सकारात्मक मार्ग निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगतानाच, सर्वांचे समाधान होणार नसले तरी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी आमदार रोहित पवार यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. डॉक्टरांनी रोहित पवार यांची वैद्यकीय तपासणी केली असून, रोहित पवारांची शुगर लक्षणीयरीत्या कमी होऊन ८३ वर आली आहे. शुगर घटल्याने त्यांच्या शरीरात प्रचंड अशक्तपणा आला असला तरी रक्तदाब सध्या नियंत्रणात आहे. डॉक्टरांच्या पथकाने त्यांना तातडीने सलाईन लावण्याचा व विश्रांतीचा सल्ला दिला आहे. ''जोपर्यंत कर्जमाफीतील जाचक अटी रद्द होत नाहीत, तोपर्यंत मागे हटणार नाही,'' असा निर्धार रोहित पवारांनी व्यक्त केला असून कार्यकर्त्यांनी त्यांच्या आरोग्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

## रोहित पवारांच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा

पंढरपूर दि.१३ (प्रतिनिधी)– शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे उपोषण सुरू केले. राज्य सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' सुरूच राहील, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला. त्यांच्या या उपोषणाला आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दर्शवला असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हेदेखील पंढरपुरात जाऊन उपोषणाला बसणार आहे. खुद्द सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्या संदर्भातील घोषणा केली आहे.

भाजपा आणि महायुती सरकारवर टीका करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून जाचक अटींमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी करून सात–बारा कोरा करा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरु केलेल्या उपोषणाला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा आहे. त्यांनी केलेल्या मागण्या रास्त आहेत, त्या सरकारने तात्काळ मान्य करायला हव्यात.

रोहित पवार यांच्या उपोषणस्थळी जाऊन मी सुद्धा उपोषण करणार आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते माजी आमदार अनंत गाडगीळ हेदेखील उपस्थित होते.

## सरकारने स्वत:लाच १०० पैकी १०० गुण दिले, पण जनतेने नापास केले!

### विजय वडेट्टीवारांचा महायुतीवर घणाघात



मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)– महायुती सरकारच्या कामकाजावर काँग्रेस नेते तथा विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जोरदार टीका केली आहे. सरकार स्वतःच्या कामगिरीचे मोठमोठे दावे करत असले, तरी प्रत्यक्षात जनतेचा अनुभव वेगळाच असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत सरकारला लक्ष्य केले.

वडेट्टीवार म्हणाले की, स्वतः च्या पाठीवर थाप मारण्यात सरकार अव्वल ठरले असले तरी जनतेने त्यांना वास्तवाचा आरसा दाखवला आहे. फेसबुक, एक्स (ट्विटर) आणि जाहिरातींमधून विकासाचे दावे करणाऱ्या सरकारचे वास्तव सर्वेक्षणातून समोर आले असल्याचा दावा त्यांनी केला.

महायुती सरकार महाराष्ट्राला मॅग्नेटिक महाराष्ट्र बनवल्याचा दावा करत आहे. परंतु सर्वेक्षणात रोजगारनिर्मितीबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले. दावोस परिषदेत झालेल्या गुंतवणूक करारांच्या मोठ्या घोषणा करण्यात आल्या, मात्र त्याचा रोजगारनिर्मितीवर अपेक्षित परिणाम झालेला दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला. ''जर रोजगारच निर्माण झाला नसेल, तर दावोसमधील करार आणि घोषणांचा नेमका फायदा काय झाला?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सामान्य नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर भाष्य करताना वडेट्टीवार म्हणाले की, गेल्या एका वर्षात मोठ्या प्रमाणावर कुटुंबांचा घरखर्च वाढला आहे. महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडले असून लोक खिसा कापून जगत आहेत. मात्र सरकार अजूनही अच्छे दिनचे चित्र रंगवत असल्याची टीका त्यांनी केली.

## अजित पवारांप्रमाणेच एकनाथ शिंदेंचाही अपघात होऊ शकतो, शिंदेसेनेच्या नेत्याच्या वक्तव्याने खळबळ

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)– राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झालं. विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्याचप्रमाणे आता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही अपघात होऊ शकतो, असा मोठा दावा शिवसेनेच्याच नेत्याने केला आहे. शिवसेनेचे माळशिरस पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय मगर यांनी एकनाथ शिंदे यांच्याविषयी मोठं वक्तव्य केलं आहे. त्यांनी रोहित पवारांच्या अन्नत्याग आंदोलनात सहभाग घेत त्यांना पाठिंबा दर्शवला. रोहित पवारांच्या अन्नत्याग आंदोलनाला संबोधित करताना दत्तात्रय मगर म्हणाले, आपल्यातून अजितदादा गेले. ते कसे गेले हे सर्वांना माहीत आहे. पण इथून पुढे असा कोणताही नेता जाता कामा नये. मला सर्वांत जास्त खंत वाटते एकनाथ शिंदेंची. एकनाथ शिंदे यांच्याबरोबरही असाच घात होऊ शकतो. त्यामुळे मी त्यांच्याबरोबर आहे. एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत हा मेसेज जाऊद्या. तुमच्याबरोबरही असा घात झाल्याशिवाय राहणार नाही. ही मला खंत वाटतेय.'' सत्तेत राहूनही रोहित पवारांना पाठिंबा दिल्याबाबत त्यांना विचारण्यात आलं. त्यावर ते म्हणाले, सत्तेचा जुगार सुरू आहे. पत्तेच्या पानाप्रमाणे जुगार सुरू आहे. आम्ही विरोधात आहोत, म्हणून. आम्हाला मशिनने मतं दिली का? आम्ही शेण काढायचंच काम करायचं का? आम्हाला काही कामं नाहीत का? गोर गरीब जनतेची कामं करायची नाहीत का? प्रशासन चार वर्षे तुमच्या ताब्यात होतं. जनतेची सेवा करण्याची संधी जनतेने दिलीय. पण निधीच देत नाहीत. '' असे त्यांनी म्हटले.

## एल निनोमुळे मान्सून रेंगाळला; यंदा महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज, पुणे वेधशाळेचा इशारा!

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)– यंदाच्या मान्सूनवर एल निनोचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येत असून देशात आणि महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पुणे वेधशाळेचे हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी याबाबत माहिती देताना यंदा मान्सून हंगामात सरासरीच्या सुमारे ९० टक्के इतकाच पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे. सानप यांनी सांगितले की, सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी आवश्यक वातावरणीय परिस्थिती अनुकूल नसल्याने त्याचा वेग मंदावला आहे. त्यामुळे मान्सून महाराष्ट्रात पुढे सरकण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागू शकते. पुढील काही दिवस राज्यात व्यापक स्वरूपाच्या पावसाची शक्यता नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मान्सूनच्या आगमनापूर्वी राज्यातील काही भागांत पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली असली तरी शेतकऱ्यांनी त्यावर अवलंबून राहून घाईघाईने पेरणी करू नये, असा महत्त्वाचा सल्लाही त्यांनी दिला. पावसामध्ये खंड पडण्याची शक्यता लक्षात घेता पेरणीचे निर्णय काळजीपूर्वक घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. एल निनोच्या प्रभावामुळे यंदा महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहण्याची शक्यता असून त्याचा परिणाम शेती, जलसाठे आणि पाणीपुरवठ्यावर होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी आणि संबंधित यंत्रणांनी आगामी काळातील हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन नियोजन करण्याची गरज असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले आहे. दरम्यान, मान्सूनची पुढील प्रगती आणि पावसाची स्थिती यावर राज्यातील कृषी क्षेत्राचे लक्ष लागले असून आगामी काही दिवस हवामानाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत.

एल निनो आणि दुष्काळ यांचा थेट संबंध असल्याचे निश्चितपणे सांगता येत नसले, तरी भूतकाळातील अनेक दुष्काळी परिस्थितींमध्ये एल निनोचा प्रभाव जाणवला आहे. त्यामुळे हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या शक्यतांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. जर मान्सून अपेक्षेपेक्षा कमी झाला, तर पावसावर अवलंबून असलेल्या भागांमध्ये पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे.

## इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या अंत्यविधीची तारीख जाहीर

तेहरान दि.१३ (प्रतिनिधी)– इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांच्या अंत्यसंस्काराची तारीख घोषित करण्यात आली आहे. तेहरान प्रशासनाने याची संपूर्ण माहिती शेअर केली आहे. ज्यानुसार ४ जुलैपासून अंत्यसंस्काराच्या प्रक्रियेला सुरूवात होईल. ९ जुलै रोजी अयातुल्लाह खामेनेई यांना मशहदमध्ये दफन केले जाईल. हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे जेव्हा देशभरात मोहरमचा उत्सव सुरू आहे. तेहरानचे महापौर अलीरेझा झकानी यांनी सांगितले की, दिवंगत सर्वोच्च नेते अली खामेनेई यांचा शासकीय अंत्यसंस्कार पुढे ढकलण्यात आला आहे. मोहरमच्या काळात पारंपरिक कार्यक्रम आणि शोक समारंभांमध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून खामेनेई यांच्याबाबत पूर्वी नियोजित कार्यक्रमात बदल करण्यात आला आहे. मोहरमच्या दहाव्या दिवशी अंत्यविधी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## आसाममध्ये १८ वर्षांवरील व्यक्तींना मिळणार नाही आधार कार्ड

दिसपूर दि.१३ (वृत्तसंस्था)– बेकायदेशीरपणे भारतात स्थलांतरित झालेल्या बांगलादेशी नागरिकांना आधार कार्ड मिळू नये यासाठी आसाम सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आसाममध्ये १८ वर्षांवरील व्यक्तींना आधार कार्ड वितरित केले जाणार नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी शनिवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केली आहे. ''१८ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही व्यक्तीला आधार कार्ड दिले जाणार नाही, असा निर्णय आसामच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे'', असे सरमा यांनी गुवाहाटी येथे पत्रकारांना सांगितले. ''एसटी, एससी, चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या लोकांना मार्च २०२७ पर्यंतच आधार कार्ड मिळू शकेल'', असेही त्यांनी घोषित केले.

अपवादात्मक परिस्थितीत आधार कार्ड वितरित करायचे असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवावा. राज्य सरकारची परवानगी घ्यावी. संबंधित व्यक्ती आधार कार्ड मिळवण्यासाठी पात्र आहे की अपात्र याचा निर्णय सरकार घेईल, असे सरमा यांनी स्पष्ट केले. आधार कार्ड वाटप काही जिल्ह्यांमध्ये १०० टक्के झालेले असताना अतिरिक्त आधार कार्डसाठी अर्ज प्राप्त होत असल्याकडे सरमा यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, ''काही जिल्ह्यांमध्ये १०० टक्के आधार कार्ड वाटप झाले आहेत. त्यामुळे अतिरिक्त आधार कार्ड घेणारे लोक कोण आहेत हे ओळखणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही बेकायदेशीर बांगलादेशीला आधार कार्ड मिळू नये म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे.'' दरम्यान, १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्यांना आधार कार्ड पूर्वीप्रमाणेच वितरित केले जाईल.

## छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांचे आठ तळ उद्‌ध्वस्त; २३ आयईडींसह शस्त्रसाठा जप्त




गडचिरोली दि.१३ (प्रतिनिधी)– छत्तीसगडमधील नक्षलप्रभावित बिजापूर आणि गरियाबंद जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी शुक्रवारी राबविलेल्या व्यापक शोधमोहीमेत नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ उद्‌ध्वस्त केले. या कारवाईत २३ जिवंत आयईडी, शस्त्रास्त्रे आणि स्फोटकनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. जंगल परिसरात सुरक्षा दलांवर मोठा हल्ला घडवून आणण्याच्या तयारीला यामुळे धक्का बसल्याचे मानले जात आहे.

बिजापूर जिल्ह्यातील अद्री, हर्रा आणि मदुमपारा परिसरातील घनदाट जंगलात नक्षलवाद्यांची उपस्थिती असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) १९९ व्या बटालियनने विशेष शोधमोहीम हाती घेतली. कमांडंट आनंद कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सेकंड–इन–कमांड कुमार नीरज यांच्या देखरेखीखाली संयुक्त पथकाने जंगल परिसराची सखोल तपासणी केली. बी/१९९ कंपनीचे नेतृत्व कंपनी कमांडर राजीव कुमार यांनी, तर एफ/१९९ कंपनीचे नेतृत्व निरीक्षक के. बी. पांडा यांनी केले. या मोहिमेदरम्यान जवानांनी नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ शोधून काढत ते उद्‌ध्वस्त केले.

कारवाईदरम्यान एक बॅरल ग्रेनेड लॉन्चर रायफल, एक ८ एमएम रायफल आणि एक १२–बोर रायफल जप्त करण्यात आली. तसेच २१ आयईडी, कॉर्डेक्स वायर, सेफ्टी फ्युज, इलेक्ट्रिक वायर, एअरगनच्या गोळ्या, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर साहित्य असा एकूण ५८ प्रकारच्या वस्तूंचा साठा हस्तगत करण्यात आला.

# विकासाची तपपूर्ती

भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधान पद भूषविणाऱ्या नेत्यांम ध्ये नरेंद्र मोदी यांनी महत्त्वाचा टप्पा गाठला. २०१४ पासून सुरू झालेल्या त्यांच्या कार्यकाळात देशाच्या राजकारणात मोठे बदल झाले असून प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक धोरणांमध्ये विविध सुधारणा आणि उपक्रम राबवले गेले. या काळात विकास, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवांच्या विस्तारावर विशेष भर देण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधान पद भूषविणारे नेते म्हणून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ४३९९ दिवस ते पंतप्रधानपदी आहेत, हा एक उल्लेखनीय विक्रम मानला जातो. २०१४ मध्ये भारताच्या राजकीय परिस्थितीत एक मोठा बदल झाला आणि देशाने विकासाच्या दिशेने नवे टप्पे गाठले. या काळात प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक धोरणांमध्ये विविध बदल घडून आले. त्या काळात देशासमोर भ्रष्टाचार, प्रशासनातील अडथळे आणि विविध सामाजिक-राजकीय समस्या अशा अनेक आव्हानांचा सामना करावा लागत होता. अनेक लोकांच्या मते विकासाचा वेग अपेक्षेप्रमाणे नव्हता. या पार्श्वभूमीवर, सरकारने विविध सुधारणा आणि योजना राबवून प्रशासन अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला. यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढली आणि लोकशाही प्रक्रियेतील सहभाग अधिक सक्रिय झाला, असे काही विश्लेषकांचे मत आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर देशात विविध क्षेत्रांम ध्ये मोठे बदल झाल्याचे समर्थकांचे मत आहे. त्यांच्या मते, पायाभूत सुविधा, ऊर्जा, आरोग्य आणि गृहनिर्माण या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर काम झाले असून मेट्रो प्रकल्प, महामार्गांचे जाळे आणि रेल्वे सुधारणा यांना वेग मिळाला आहे.

तसेच, शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचवण्याच्या दृष्टीने विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. जन धन योजना आणि डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे थेट लाभ हस्तांतरण अधिक प्रभावी झाले. कुठल्याही भ्रष्टाचाराशिवाय आणि बोगस लाभार्थींना वगळून पैसे शेतकऱ्यांच्या आणि सामान्य जनांच्या खात्यात जमा होत आहेत. त्याचप्रमाणे, ग्रामीण आणि निमशहरी भागात पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी विविध रस्ते आणि वाहतूक प्रकल्प राबवले गेले आहेत. उडान योजनेमुळे हवाई प्रवास सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला आहे, तर वंदे भारत रेल्वे आणि मेट्रो विस्तारामुळे रेल्वे व शहरी वाहतुकीत सुधारणा झाल्याचे सांगितले जाते. समर्थकांच्या मते, या धोरणांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली असून भारताची जागतिक अर्थव्यवस्थेत भूमिका अधिक मजबूत झाली आहे.

मोदी यांनी भारताला दीर्घकाळ छळणारा काश्मीरचा प्रश्न सोडवण्यात हातभार लावला आहे. त्यांनी भाजपची अनेक वर्षांची घोषणा पूर्ण करत कलम ३७० रद्द केले आणि ही समस्या कायमस्वरूपी सोडवली, असे मानले जाते. कलम ३७० रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये एकही गोळी झाडली गेली नाही, कारण त्या वेळी केंद्रात मोदी आणि अमित शहा यांची सत्ता होती आणि त्यांनी तसा बंदोबस्त केला होता. याआधी काँग्रेसच्या काळात अल्पसंख्याकांबाबत धोरणे खूप सवलतीची असल्याची टीका केली जाते, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणांना कठोर भूमिका घेणे कठीण जात असे. मात्र मोदी सरकारने हे चित्र बदलले आणि आज काश्मीरमध्ये दगडफेकीच्या घटना अत्यंत कमी झाल्या आहेत. तिहेरी तलाक पद्धत बंद करून मुस्लीम महिलांवर होणारा अन्यायकारक प्रकार थांबवण्यात आला. यामुळे महिलांना न्याय मिळाला. काँग्रेसने महिलांच्या कल्याणासाठी घोषणा केल्या, मात्र प्रत्यक्ष हक्क देण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलली गेली नाहीत. मोदी यांच्या कार्यकाळात महिलांच्या सक्षमीकरणासाठी काही महत्त्वाच्या योजना राबवण्यात आल्या आणि त्याचा लाभ अनेक महिलांना मिळाल्याचे म्हटले जाते.

आर्थिक क्षेत्रातही त्यांच्या कार्यकाळात देशाची अर्थव्यवस्था वेगाने पुढे गेली असून, भारत जगातील आघाडीच्या अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवत आहे, असे विविध आर्थिक अहवालांमध्ये नमूद केले जाते. तसेच भारताने काही प्रगत अर्थव्यवस्थांना मागे टाकले. शेती क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देणाऱ्या योजना सुरू करण्यात आल्या. यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक आधार मिळाला. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दरवर्षी हप्त्यांद्वारे रक्कम जमा केली जाते. पूर्वीच्या तुलनेत शेतकऱ्यांपर्यंत थेट आर्थिक मदत पोहोचवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली. 'पर ड्रॉप मोअर क्रॉप'सारख्या योजना, डिजिटल प्रशासन आणि सरकारी कामकाजात पारदर्शकता वाढवण्यासाठी केलेले प्रयत्न यांचा उल्लेख केला जातो. या सर्व उपक्रमांमुळे विकासाला गती मिळाली.

अर्थात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात काही मुद्देही उपस्थित केले जातात. देशातील वाढती बेरोजगारी आणि धार्मिक ध्रुवीकरण हे त्यांच्या कारकिर्दीविरुद्धचे प्रमुख आक्षेप मानले जातात. मात्र, त्यांच्या समर्थकांच्या मते, मोदी सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक विषमता आजही अस्तित्वात आहे; परंतु त्यासाठी केवळ सरकारला जबाबदार धरता येत नाही, असे काहींचे मत आहे. भारताची मोठी लोकसंख्या आणि रोजगाराबाबतची सामाजिक-आर्थिक रचना हे देखील या सम स्येचे महत्त्वाचे घटक मानले जातात. नोटाबंदीच्या निर्णयावर म ोठ्या प्रमाणात टीका झाली होती. तरीही, या निर्णयामुळे काळ्या पैशावर नियंत्रण मिळवण्यास मदत झाली आणि अनेक वर्षे सत्तेत असलेल्या काही राजकीय पक्षांच्या प्रभावावर परिणाम झाला, असे समर्थकांचे म्हणणे आहे.

एकूणच, मोदी यांच्या कार्यकाळात भारताने आर्थिक वाढ, डिजिटल क्षेत्रातील विस्तार आणि जागतिक स्तरावर वाढलेला प्रभाव अनुभवला, असे निरीक्षण काही विश्लेषक मांडतात. भारताचे सध्याचे पंतप्रधान हे दीर्घकाळ पदावर राहिलेले नेते ठरले आहेत. काहींच्या मते, पूर्वी भारताकडे आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर फारसे लक्ष दिले जात नव्हते, मात्र आज भारत अनेक जागतिक मंचांवर अधिक ठळकपणे दिसतो. जी-२० परिषदेचे आयोजन हेही विद्यमान नेतृत्वाच्या कार्यक्षमतेचे फलित मानले जाते. विद्यमान काळात भारतात विकासाची एक मोठी प्रक्रिया सुरू असल्याचे समर्थक सांगतात आणि त्याचे परिणाम समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांचे मत आहे. अमर्त्य सेन यांनी म्हटले आहे की, जोपर्यंत शेवटच्या माणसाला विकासाची फळे मिळत नाहीत, तोपर्यंत खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येत नाही. या दृष्टिकोनातून, विकास सर्वसमावेशक असणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

# विकसित महाराष्ट्र -२०४७ साठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरणासह सर्वसमावेशक मानवी विकासासाठी राज्याचे विशेष प्रयत्न - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था) - प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रम ुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आज प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या (गव्हर्निंग कौन्सिल) अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोड मॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे म हाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिकहीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र - २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९-३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले असून शाश्वत विकास उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करण्यावर राज्याचा भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आकांक्षित जिल्ह्यांची संख्या चारवरून दहापर्यंत आणि आकांक्षित तालुक्यांची संख्या २७ वरून १७७ पर्यंत वाढविण्यात आली असून या भागांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत व्यापक सुधारणा –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी 'पोषण भी - पढाई भी', आरंभ, स्मार्ट अंगणवाडी आणि सक्षम अंगणवाडी यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. बालस्नेही शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर आणि अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू आहे. शालेय शिक्षणात महाराष्ट्राची परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्समध्ये प्रचेष्टा-१ कडे वाटचाल सुरू आहे. राज्यात २ कोटी आठ लाखांपेक्षा अधिक 'अपार आयडी' तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे, डिजिटल वर्ग, व्यावसायिक शिक्षण तसेच मुली, आदिवासी व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे.

**कौशल्य विकास, स्टार्टअप आणि नवसंशोधनाला चालना**

राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवसंशोधन धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडविणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एआय, डीप-टेक, फिनटेक आणि शाश्वतता या क्षेत्रांवर विशेष भर दिला जात असून 'महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' विकसित करण्यात येत आहे. तसेच कुशल युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी' ही संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**आरोग्य क्षेत्रात व्यापक विस्तार –** आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत. शहरी भागांसाठी स्वतंत्र शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून ११ नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे. मेडिसिटी संकल्पनेद्वारे वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तृतीयक आरोग्यसेवा आणि आयुष प्रणाली यांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**महिला सक्षमीकरणाला गती –** महिला सक्षमीकरण हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उमेद अभियानाअंतर्गत राज्यात ५० लाख लखपती दिदी झाल्या असून ही संख्या एक कोटीपर्यंत नेण्याचा मानस आहे. बचत गटांच्या उत्पादनांसाठी १३ जिल्हास्तरीय उमेद मॉल्स उभारण्यात येत आहेत. लाडकी बहीण योजनेतर्गत सध्या १.६६ कोटी महिला लाभार्थी असून या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता आणि आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

**सर्वसमावेशक विकासावर भर –** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून संधी निर्माण करण्यावर राज्याचा भर असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी १०० नवीन वसतिगृहे उभारण्यात येत असून त्यात २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची व्यवस्था होणार आहे.

**प्रशासनात तंत्रज्ञान आणि सुधारणा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने ८०० हून अधिक नागरिक आणि व्यवसाय सेवांची प्रक्रिया पुनर्रचना केली आहे. महासारथी आणि महाडीबीटी २.०द्वारे नागरिक सेवा अधिक सुलभ करण्यात येत आहेत. अर्जातील रकाने आणि कागदपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आली आहे. महाराष्ट्र एआय धोरण २०२६ अंतर्गत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि १.५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी महाॲग्री-एआय धोरण महाॲगएक्स आणि महाट्रेस यांसारखे डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**गडचिरोलीसाठी विशेष विकास आराखडा**

गडचिरोली जिल्ह्यासाठी नक्षलग्रस्त भागोत्तर विकास कार्ययोजना राबविण्यात येत असून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे. गडचिरोलीला भारतातील पहिले मोठे इंटिग्रेटेड स्टील हब म्हणून विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

'एक राज्य, एक जागतिक पर्यटन स्थळ' योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि नाशिक या ठिकाणांचा जागतिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यात येणार आहे. राज्यभरात १०० पर्यटन उप-परिपथ विकसित करण्याचे उद्दिष्ट असून धार्मिक, वारसा, जल, बेट आणि अनुभवात्मक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे.राज्यात ६३.८५ लाखांहून अधिक एमएसएम ई कार्यरत असून २.५ कोटींहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. भारतातील एकूण एफडीआयपैकी सुमारे ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याचे नमूद करून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत २०.३ लाख कोटींच्या गुंतवणुकीची पाइपलाईन तयार झाली आहे. मैत्री प्रणालीद्वारे सिंगल विंडो क्लिअरन्स, वेळेत मंजुरी आणि उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी स्थापन करण्यास मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांनी प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विकसित भारत २०४७ साठी महाराष्ट्र शासनाची कटिबद्धता व्यक्त करत केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सहकार्याने देशाला समृद्ध, आत्मनिर्भर आणि न्याय्य राष्ट्र बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालूया ! जि.प.च्या शाळांना प्रवेशासाठी निवडू या..

**जून महिना** उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासम ोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे - आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?




आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे सम ाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

**मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे**

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात. मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

**सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जातात.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे.शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

**राज्याचे शैक्षणिक धोरण; मातृभाषेचे म हत्त्व –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच म हाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर म ातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांम ध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्याच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

**आता प्रवेशासाठी लागतात रांगा –** एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते.अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून,कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

**नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली –** काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कम तरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे.गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे.त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे.शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे.निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून म ुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

**अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार –** मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय.घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे.अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील. त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

**चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या. आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू याः मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू

**– प्रवीण टाके**

उपसंचालक, (माहिती),

विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

# नेशन बिल्डर... गृहिणी !

कधी काळी मातृसत्ताक राज्य पद्धती असलेला आपल्या देशात काळाच्या ओघात पुरूषप्रधान संस्कृतीचा शिरकाव झाला आणि सर्वत्र पुरूषसत्ताक कुटुंब व्यवस्था रूळली आणि रूजली. नंतरच्या काळात स्त्रियांना बरोबरीचा दर्जा राहीला नाही. जगभरात स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आंदोलन करावी लागली. आपल्या देशात संविधानाने समान हक्क मान्य केला असला तरी आज समान वागणूक हा प्रश्न आहे. सोबत महिला मुक्ती तसेच महिला तसेच महिला सबलीकरण यावर देखील चर्चा होते. या बाबत सर्वोच्च न्यायालयाने एका अपघात विमा प्रकरणात ऐतिहासिक निवाडा दिला आहे तो महत्वाचा आहे. याद्वारे महिलांना गृहिणी न म्हणता राष्ट्र निर्मितीमधील एक व्यक्ती म्हणून मान्यता द्यावी असे भाष्य केले आहे.

साधारणपणे गृहिणीचे स्थान घराघरात रांधा-वाढा-उष्टी काढा इतपत मानले जाते. ती गृहिणी व्यक्ती म्हूणन जगताना जी विविध नाती जपते आणि त्या निमित्ताने जे कष्ट उपसत असते त्याचे मोल केले जात नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' असं आपण म्हणतो तर दुसरीकडे मुलगी शिकली प्रगती झालीअसही सांगतो. सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिला त्याचा संदर्भ अपघात विमा दाव्याशी संदर्भ ठेवून आहे. घरातील एखादा कर्ता पुरूष अपघातात मरण पावला तर त्याचं वय, कमाई आणि अपेक्षित जीवनमान याच्या आधारे भरपाईची रक्कम ठरविली जाते.

अपघातात मरण पावलेली माहिला कमावती नसेल आणि ती केवळ गृहिणी असेल तर भरपाईचे मोजमापच नाही. म्हणूनच हा निवाडा महत्वाचा आहे.

घरात असणारी सर्व प्रकारची कामे, तसेच मुलांचे संगोपन, शिक्षण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्कार देण्यात गृहिणीचा मोठा वाटा असतो. पुरूषाने फक्त नोकरी-व्यवसाय करुन कुटूंबाच्या निर्वाहासाठी पैसा कमावणं इतकच आपला समाज मानतो. घरातील या कामांसाठी महिलांना पत्नी म्हणून पगार देणारा पती हा प्रकार आपल्याकडे नाही. त्यामुळे गृहिणी म्हणून ती व्यक्ती, ती स्त्री, आपल सर्वस्व झोकून देऊन नवी पिढी घडवत असते. प्रसंगी स्वत: उपाशी राहून मुलांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करते. या अर्थाने ती नवी पिढी घडविण्याचे राष्ट्रीय कार्य करते. म्हणून तीला 'नेशन बिल्डर' चा दर्जा असावा असे निरीक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

आपण जर आपल्या आयुष्यात जरा वळून बघितल तर जानवेल की ती गृहिणी म्हणून घरात वावरताना पत्नी, सून, आई, या विविध नात्यांची गुंफण जपत स्वत:ची पर्वा न करता आणि कोणत्याही आभाराची अपेक्षा न करता राबते आणि अगदी घरातील व्यक्ती म्हणून वावरताना ती सतत टोमणे सहन करीत असते. मुलं देखील हॉटेलमध्ये ऑर्डर द्यावी तशी खाण्यासाठी 'ऑर्डर' सोडतात. हे घराघरातल चित्र आहे. नाही म्हणायला तिचा मोठेपणा मिरवायला हल्ली ग्रिटींग कार्ड, केक आिा पार्टीच्या माध्यमातून 'मदर्स डे' साजरा केला जातो. घरातील स्त्रिया माता म्हणून मिळणारा मान वगळता इतर बाबतीत तिचं आणि तिच्या कामाचं महत्व दुर्लक्षित होत. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीवर सर्व अवलंबून असतात असे नव्हे तर कुटुंबातील कमावत्या सदस्यासोबतच सारं कुटुंब तिच्यावर अवलंबून असतं म्हणून ती 'नेशन बिल्डर'.

'मातृ देवो भव' म्हणायचं, सण, उत्सवात दुर्गा व इतर देवींची पुजा करतो मात्र घरातलं दैवत वंचित राहतं. न्यायालयाच्या या निर्णयानं या निमित्तानं एक नवा विचार समोर आणला आहे आणि Gen Z सह सर्वानाच तो मान्य असावा.

**- प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६

## राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; सक्षम पणन सुधारणांचा नवा अध्याय

# शेतकऱ्यांच्या हितासाठी मुंबई आणि नागपूर राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अस्तित्वात

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६३ मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' ही संकल्पना आहे.

या सुधारणांची बीजे २०२४-०५ पासून पेरली गेली. त्यानंतर २०१७-१८ मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे.

पणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

त्याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल.

राष्ट्रीय बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान ८० हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल.

मोठ्या बाजारांमध्ये पणन मंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील.

बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी-केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत.

या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल ॲग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे १२०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे.

या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या १२ ते १४ तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचवणे शक्य होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील.

राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

- बी.सी.झंवर, विभागीय संपर्क अधिकारी.

# अयोध्येपासून राष्ट्रापर्यंत: भगवान श्रीरामांच्या जिवंत रक्तरेषेला राष्ट्रव्यापी समर्थन

भारताच्या सभ्यता आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू भगवान श्रीराम आहेत. मर्यादा, धर्म आणि आदर्श शासनाचे प्रतीक. शतकानुशतके रामायण हे केवळ ग्रंथ राहिलेले नाही, तर जीवनाची प्रेरणा राहिले आहे. आज इतिहास आणि परंपरेचा हा प्रवाह एका नवा टप्प्यावर पोहोचला आहे. श्री अजय हरिनाथ सिंह, त्यांच्या कुलगुरु जगद्गुरु रामभद्राचार्यजी यांच्या प्रमाणासह, भगवान श्रीरामांच्या पुत्र लवकुळापासून आलेल्या १००% जिवंत रक्तवंशाचे एकमेव वारस म्हणून सिद्ध झाले आहेत. ही मान्यता आता फक्त वंशावळीत मर्यादित राहिलेली नाही. तर तिला राजकीय स्वीकृती आणि समर्थन देखील लाभले आहे.

**उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्राचे समर्थन** – या तीन राज्यांचे उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी या वंशपरंपरेला औपचारिक समर्थन, स्वीकृती आणि मान्यता दिली आहे.

- उत्तर प्रदेश, जिथे अयोध्या आणि श्रीराम जन्मभूमी आहे, त्यांनी या जिवंत परंपरेला मान्यता देऊन ऐतिहासिक जबाबदारी पार पाडली.
- हरियाणा, जे धर्म आणि पराक्रमाची भूमी आहे, त्यांनी पूर्ण समर्थन दिले आणि संदेश दिला की धर्म व परंपरेचे रक्षण आजही सर्वोच्च आहे.
- महाराष्ट्र, जिथे छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांनी धर्म आणि संस्कृतीचे रक्षण केले, तेथील सरकारनेही या याचिकेला समर्थन देऊन परंपरा आणि राजकारणाचा संगम घडवून आणला.

**गुरुची भूमिका: जगद्गुरु रामभद्राचार्यजी**

सनातन परंपरेत वंश रक्ताने पूर्ण होत नाही, तर गुरुच्या कृपेने पूर्ण होतो. जगद्गुरु रामभद्राचार्यजी यांनी स्वतः श्री अजय हरिनाथ सिंह यांना भगवान श्रीरामांचा जिवंत रक्तवंश घोषित केले आहे.

**जीवंत रामायण** – श्री अजय हरिनाथ सिंह, आपल्या गुरुंच्या मार्गदर्शनाखाली, केवळ एक व्यक्ती नाहीत तर जीवंत रामायण आहेत. त्यांचे जीवन सत्य, करुणा, विनम्रता आणि धर्माच्या आदर्शांवर आधारलेले आहे.

**निष्कर्ष** – सर्वोच्च न्यायालयातील ही झखड आता फक्त एक याचिका नाही, ती एक राष्ट्रीय चळवळ बनली आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वाच्या समर्थनासह आणि जगद्गुरु रामभद्राचार्यजींच्या प्रमाणिकतेसह, यात आता काहीही शंका नाही की श्री अजय हरिनाथ सिंह हे भगवान श्रीरामांच्या १००% जिवंत रक्तरेषेचे एकमेव वारस आहेत.

# श्री रामाच्या जयघोषासह मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा संपन्न

नाशिक, दि १३ (प्रतिनिधी) : नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळ्याने शुभारंभ झाला आहे. आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित व भव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी शासन, प्रशासन, साधू-संत, महंत, विविध सामाजिक, धार्मिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

श्री गंगा गोदावरी पंचकोठी (तीर्थ) पुरोहित संघ, नाशिकच्यावतीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा आज सकाळी कमला एकादशीच्या पर्वावर पवित्र रामकुंड, नाशिक येथे कुंभमेळा मंत्री श्री. महाजन यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी



महापौर हिमगौरी आडके-आहेर, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, उपमहापौर विलास शिंदे, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप, पुरोहित संघाचे सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू-संत, महंत उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होत असून मागील कुंभमेळ्यापेक्षा चार ते पाच पट अधिक, म्हणजेच १२ कोटींपेक्षा जास्त भाविकांच्या आगमनाची अपेक्षा आहे. त्यामुळे कुंभमेळा यशस्वी करण्याची जबाबदारी शासन, प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध संघटनांनी आणि भक्तगणांनी पुढाकार घेतला असून ही स्वच्छता केवळ एका दिवसापुरती नसून सातत्याने राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी प्रत्येक नाशिककराने स्वयंसेवक बनून पुढाकार घ्यावा.

कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि जिल्ह्यात विविध विकासकामांना वेग आला आहे. रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि नागरी सुविधांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची अंमलबजावणी सुरू आहे. या विकासकामांमुळे पुढील वर्षी नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्याच्या तयारीत साधू-संत, महंत, आखाडे, लोकप्रतिनिधी, प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगून मंत्री श्री. महाजन यांनी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे नमूद करुन त्यांनी कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, संजयदत्त महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी दिगंबर आखाड्याचे महंत वैष्णवदास महाराज, मंगल पीठाधीश्वर माधवाचार्य महाराज, निर्वाणी आखाड्याचे महंत मुरलीधरदास महाराज, महंत मोहनदास महाराज, महंत राजेंद्रदास महाराज, महंत रामजीदास महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज, रामकिशोरदास शास्त्री महाराज, महंत राम स्नेहीदास महाराज यांच्यासह विविध आखाड्यांचे संत-महंत, भाविक, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विधीवत पूजा करुन गंगा गोदावरीचे पूजन करण्यात आले. शंखनाद आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन समारंभ भक्तीमय वातावरणात पार पडला. पुरोहित संघाच्या सदस्यांनी मंत्रोच्चार केले.

# तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान; तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर,दि १३ (प्रतिनिधी) – विभागातील तेलबिया व कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्यासाठी तसेच स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (NMEO-OS) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत विविध प्रक्रिया युनिट्स व गोदामांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून सबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज मागविण्यात आले आहेत.

योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी अंदाजित खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. तसेच १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल १९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेससह) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल.मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेस शिवाय ) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. याशिवाय कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट (किमान क्षमता ३०० किलो प्रतितास) स्थापनेसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

गोदाम बांधकामासाठी एफपीओ, एफपीसी, सहकारी संस्था, सरकारी व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था (CBBOs) पात्र असून मूल्य साखळी भागीदार (VCP) गटांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. तेल काढणी युनिटसाठी वैयक्तिक शेतकरी, एफपीओ, सहकारी संस्था, खासगी उद्योग आणि नोंदणीकृत नवीन तेल प्रक्रिया कंपन्या अर्ज करू शकतात. कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी एफपीओ, क्लस्टर स्तरावरील महासंघ (CLFs), PACS आणि वैयक्तिक उद्योजक पात्र आहेत. लाभार्थ्यांनी स्वतःचे किमान १५ टक्के भांडवल उपलब्ध करणे आवश्यक असून बँक कर्ज घेणे अनिवार्य आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज आपल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तातडीने सादर करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# राजर्षी शाहू महाराज मानधन योजना

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – शासनाच्या 'राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने' अंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.दि.१ जुलै, २०२६ ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत , जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

१६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयानुसार, या योजनेद्वारे पात्र जेष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रती महिना ५,००० रुपये मानधन दिले जाते.अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त असावे (दिव्यांगांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे आहे). कला किंवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६०,००० रुपयांपेक्षा जास्त नसावे.अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. तसेच, अर्जदार इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेचा लाभार्थी नसावा. इच्छुक आणि पात्र साहित्यिक,कलाकारांनी आपले अर्ज महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १ जुलै, २०२६ ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्जासोबत वयाचा दाखला, आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला आणि बँक तपशिलासह आवश्यक. अपंगत्व दाखला लागू असल्यास केंद्र किंवा राज्य सरकार पुरस्कार प्रमाणपत्र असल्यास तसेच नामांकित संस्था किंवा व्यक्ती यांच्या शिफारस पत्र व या संबंधित विविध पुरावे याची कागदपत्रे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

# दिव्यांग व्यक्तींनी स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१२ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या,सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंरोजगारासाठी 'बीज भांडवल योजना २०२६-२७' साठी अर्ज मागवण्यात आले आहेत.दि. १० जून २०२६ ते २० जुलै २०२६या दरम्यान अर्ज दाखल करण्याचे आवाहन श्री. बाबासाहेब अरवत, सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, यांनी केले आहे.

अर्ज प्रक्रिया दरवर्षीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. ही योजना बँकेमार्फत राबवली जाते. बँकेच्या नियमानुसार १.५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्यानंतर, दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून मंजूर कर्जाच्या २०% रक्कम सबसिडी (अनुदान) म्हणून दिली जाते. योजनेसाठी दिव्यांग प्रवर्गातील अंध, कर्णबधीर आणि अस्थिव्यंग व्यक्ती अर्ज करू शकतात. मात्र, मतिमंद (बौद्धिक अक्षम) प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना यासाठी अर्ज करता येणार नाही.अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असावे.

**अर्जदाराने अर्जासोबत** – तहसीलदार यांचे मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, तहसीलदार यांनी निर्गमित केलेले अर्ज दाराचे रहिवासी प्रमाणपत्र, बेरोजगार प्रमाणपत्र व ठराविक व्यवसायासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र'. रेशन कार्ड, मतदान कार्ड, आधार कार्ड. ४०% किंवा त्याहून अधिक टक्केवारीचे दिव्यांग (UDID) प्रमाणपत्र. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो. व्यवसायाचे कोटेशन व प्रकल्प अहवाल. जागेबाबत भाडे पावती, करारनामा किंवा मालकी हक्काचा पुरावा. ही कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्जदारांनी अर्जातील सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा आणि आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज 'दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय' येथे १० जून २०२६ ते २० जुलै २०२६या दरम्यान दाखल करावा.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यक्षेत्रातील दिव्यांग बांधव-भगिनींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. बाबासाहेब अरवत, सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ट्रकच्या धडकेत मोपेडवरील युवक-युवतीचा मृत्यू, चालकाचाही अंत

गंगापूर/कायगाव दि.१३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर-गंगापूर मुख्य महामार्गावर शनिवारच्या सकाळी काळजाचा थरकाप उडवणारा अपघात झाला. शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी मोपेडवरून निघालेल्या जालन्यातील एका तरुण आणि तरुणीला महामार्गावर काळाने गाठले. एका सुसाट वेगाने जाणाऱ्या कर्नाटकच्या ट्रकने मोपेडला एवढी भीषण धडक दिली की, मोपेड थेट ट्रकच्या मागील चाकाखाली चिरडली गेली, तर अनियंत्रित झालेला अवाढव्य ट्रक रस्त्यापासून २५ फूट दूर शेतात जाऊन उलटला. या रक्ताच्या थरारात जालन्यातील युवक-युवतीसह ट्रकमध्ये अडकलेल्या कर्नाटकच्या चालकाचा अशा तिघांचा अत्यंत करुण अंत झाला आहे.



पोलीस सूत्रांकडून आणि प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, जालना येथील रहिवासी असलेले महादेव चंद्रकांत घुले (वय ३०) आणि त्यांची मैत्रीण मीरा कडूबा पांडव (वय २५) हे दोघे शनिवार, १३ जून रोजी सकाळी आपल्या मोपेड (क्रमांक एमएच २० एचयु ४४०७) वरून छत्रपती संभाजीनगरमार्गे शिर्डीकडे देवदर्शनासाठी निघाले होते. त्यांची मोपेड सकाळी ११ वाजेच्या सुमारास गंगापूर जवळील बाबरगाव फाट्यावरून जात असताना, समोरून अत्यंत वेगाने कर्नाटकच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव ट्रकने (क्रमांक केए ५६ ८७६८) त्यांना चिरडले. ही धडक एवढी गतिमान होती की, महादेव घुले यांचा घटनास्थळावरच छिन्नविच्छिन्न होऊन जागीच मृत्यू झाला.

अपघाताचा भीषण आवाज होताच महामार्गावरील प्रवाशांनी आणि स्थानिक शेतकऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या तरुणीला वाचवण्यासाठी १०८ रुग्णवाहिका चालक शुभम वाघमारे आणि सागर शेजूळ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मीरा पांडव यांना गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन मुंदडा यांनी त्यांच्यावर तातडीने प्राथमिक उपचार केले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, दुर्दैवाने डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान मीरा यांची प्राणज्योत मालवली.

दुसरीकडे, मोपेडवरील दोघांना चिरडल्यानंतर ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा पूर्णपणे सुटला. हा अवाढव्य ट्रक हायवे सोडून रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात तब्बल २५ फूट अंतरावर जाऊन वेगाने उलटला. ट्रक उलटा झाल्यामुळे चालक केबिनमध्येच अत्यंत वाईट रीतीने अडकून पडला होता. स्थानिक ग्रामस्थांनी लोखंडी रॉडच्या साहाय्याने केबिन तोडून चालकाला रक्ताच्या थारोळ्यात बाहेर काढले, मात्र गंभीर अंतर्गत दुखापतीमुळे त्याचाही मृत्यू झाला होता. पोलिसांनी तपास केला असता मृत चालकाचे नाव राजकुमार देवेंद्र आप्पा (वय ४६, रा. मंगलगी, कर्नाटक) असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या भीषण दुर्घटनेमुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. दोन्ही वाहनांचा अक्षरशः पालापाचोळा आणि चुराडा झाल्याने अपघाताच्या भीषणतेची कल्पना येत होती. घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला काढली आणि पंचनामा करून वाहतूक पुन्हा सुरळीत केली. देवदर्शनासाठी निघालेल्या दोन निष्पाप सुशिक्षित तरुणांचा असा अचानक अंत झाल्याने जालना आणि गंगापूर परिसरात अत्यंत तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# घाटीत पैठण, फुलंब्री येथील मॅकेनिक बांधवांची सेवा सुरूच, मेडिसिन विभाग, मध्यवर्ती ग्रंथालय, अपघात विभागात दिली सेवा



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) हे मराठवाडा खान्देश, विदर्भासह राज्यातील १६ जिल्ह्यांचे आरोग्यकेंद्र बनले आहेत. त्यामुळे येथे नेहमीच रुग्ण आणि नातेवाईकांची गर्दी पाहायला मिळते. घाटी प्रशासन उच्चदर्जाची रुग्णसेवा आणि सोईसुविधा देत असल्याने गर्दी वाढत आहे. यामुळे येथील सेवेत खारीचा वाटा म्हणून औरंगाबाद टू व्हिलर मॅकेनिक असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखा यांनी मोफत सेवा सुरू केली आहे.

घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद टू व्हिलर मॅकेनिक असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरचे संस्थापक चांद सय्यद यांनी ही संकल्पना सुरु केली.

शुक्रवार, ५ जून रोजी बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) येथे शहर पदाधिकारी यांनी जवळपास ३० खुर्च्या, सहा स्ट्रेचर आदीची वेल्डिंग आणि दुरुस्ती केली. यानंतर सोमवार, ८ जून रोजी पैठण येथील ग्रामीण पदाधिकारी यांनी मेडीसिन विभागात पेशंटचे २५ बेडसह ट्रॉली, खुर्च्या, स्टूलची दुरुस्ती केली गेली. शुक्रवार, १२ जून रोजी फुलंब्री येथील पदाधिकारी यांनी मध्यवर्ती ग्रंथालय येथे ३८ खुर्च्या, अपघात विभागातील ३ स्ट्रेचर, ३ व्हिलचेयर, मेडिसिन विभागातील उर्वरित १४ पेशंट बेड आदि दुरुस्त केले. याप्रसंगी पैठण मॅकेनिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा औरंगाबाद टू व्हीलर मेकॅनिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव कुमावत, माजी अध्यक्ष जनार्दन गरसुळे, महादेव महापुरे, संतोष लोहगळे, जिल्हा उपाध्यक्ष शेख नुर, चाँद सय्यद यांनी योगदान दिले. ग्रंथालय येथे ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, लिपिक मुराद शेख आदींनी सहकार्य केले. यावेळी फुलंब्री मॅकेनिक संघटनेचे अध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष कृष्णा तुपे, विभागप्रमुख विठ्ठल साबळे, साजेद मन्सुरी, अजिनाथ पवार, दिनेश भाकरे, शोहेब मन्सूरी, जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना शेख, शेख नुर , पडेगाव येथील विभागप्रमुख संदिप भालेकर, संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद सय्यद सहभागी झाले होते.

## औरंगाबाद लेणीत आज हेरिटेज व फोटो वॉकचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाउंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट आणि गाइड मीडिया प्रा. लि. आणि भारत पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १४) सकाळी ६:३० वाजता शहरातील औरंगाबाद लेणी क्रमांक १ ते ५ दरम्यान हेरिटेज वॉक आणि फोटो वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील वारसा जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न आणि नव्या पिढीला वारसास्थळांची ओळख करून देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळच्या औरंगाबाद लेणीवर हेरिटेज वॉक व फोटो वॉक होणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्व विभागाचे सहाय्यक प्रा. आशुतोष पाटील आणि ओम परदेशी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या औरंगाबाद लेण्या हा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे. इ.स. सहावे ते सातव्या शतकादरम्यान कोरलेल्या या लेण्या बौद्ध परंपरेचे दर्शन घडवतात.

येथील अप्रतिम शिल्पकला, विहार आणि ध्यानमय वातावरण प्राचीन भारतीय कलेची साक्ष देतात. अजिंठा आणि वेरूळ यांच्यातील महत्त्वाचा सांस्कृतिक दुवा म्हणून या लेण्यांना विशेष स्थान आहे. या वारसास्थळाच्या इतिहास, कला आणि वैभवाचा अनुभव हेरिटेज वॉकमुळे घेता येईल. वॉक दरम्यान उपस्थितांनी स्वतः लेणीचा काढलेल्या सर्वोत्तम फोटोंचे प्रदर्शन गरवारे कम्युनिटी सेंटर, एन-७ येथे याच दिवशी सायंकाळी ६ वाजता भरवण्यात येणार आहे. यातील तीन सर्वोत्कृष्ट फोटोंना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हेरिटेज वॉकसाठी सर्वांना खुला व निःशुल्क प्रवेश असून इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, हौशी फोटोग्राफर व नागरिकांनी आपल्या कुटुंबासह वॉकला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मराठवाड्यासाठी पथदर्शक ठरतोय छत्रपती संभाजीनगर कचरा व्यवस्थापन पॅटर्न; विभागीय आयुक्त यांच्या पुढाकाराने ८ जिल्हाधिकाऱ्यांकडून ट्रान्सफर स्टेशनची पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी घेतलेल्या विशेष पुढाकारातून शहरातील -१२ येथील अत्याधुनिक स्वच्छ घनकचरा हस्तांतरण केंद्राला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी भेट दिली. संपूर्ण मराठवाड्याचे प्रशासकीय नेतृत्व एकाच वेळी छत्रपती संभाजीनगरच्या या कचरा व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी एकत्र आल्याने, या आधुनिक पॅटर्नची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह नेतृत्वाखालील या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने या कचरा हस्तांतरण केंद्रात एकत्र चहा घेत अनौपचारिक पण अत्यंत महत्त्वपूर्ण चर्चा केली. या दौऱ्यात छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जालन्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, धाराशीवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भरत बास्तेवाड हे सर्व प्रमुख भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी सहभागी झाले होते. या दौऱ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, कचरा हस्तांतरण केंद्र असूनही या ठिकाणी कुठेही दुर्गंधी नव्हती. केंद्रातील ही स्वच्छता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर पाहून सर्वच जिल्हाधिकारी प्रभावित झाले.

या शिष्टमंडळाने केंद्रातील विविध विभागांना भेटी देऊन, घराघरातून संकलित होणाऱ्या कचऱ्याचे ओला व सुका अशा स्वरूपात स्वतंत्र वर्गीकरण करून ते पुढील प्रक्रिया केंद्रांकडे कसे पाठवले जाते, याची सविस्तर माहिती घेतली. आपल्या स्वतःच्या जिल्ह्यातही अशाच पद्धतीचे आधुनिक मॉडेल राबवून घनकचऱ्याची विल्हेवाट लावता यावी, या उद्देशाने विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी या संपूर्ण सिस्टीमचे बारकावे समजून घेतले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कचऱ्याची अत्यंत पद्धतशीर आणि विना-दुर्गंधी विल्हेवाट लावण्याची ही गती पाहून, इतर शहरांमध्येही याच धर्तीवर व्यवस्था उभारण्याची गरज उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या दौऱ्यात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्मार्ट सिटीच्या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची विशेष पाहणी घडवून आणण्यात आली. शहरात कचरा संकलित करणाऱ्या गाड्यांचे थेट ट्रॅकिंग आणि मॉनिटरिंग या हायटेक सेंटरमधून कसे केले जाते, याचे थेट प्रात्यक्षिक यावेळी अधिकाऱ्यांना दाखवण्यात आले. तंत्रज्ञानाच्या या प्रभावी वापरामुळे संपूर्ण कचरा संकलन प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता आल्याचे पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी मनपाच्या या डिजिटल उपक्रमाचे कौतुक केले.



या भेटीदरम्यान छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या वतीने विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्माल्य पासून तयार करण्यात आलेले सेंद्रिय खत अनोखी भेट म्हणून प्रदान केले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका उपायुक्त व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे यांनी शिष्टमंडळाला केंद्रातील प्रभावी कचरा वर्गीकरण, डिजिटल वेहिकल ट्रॅकिंग, दुर्गंधीमुक्त वातावरण आणि आधुनिक सुविधांची माहिती दिली.

## वैजापूरचे दलित मित्र पुरस्कार प्राप्त डॉ. व्ही.जी.शिंदे अनंतात विलीन

वैजापूर दि.१३ (प्रतिनिधी)- येथील पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष ,व महाराष्ट्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित केलेले तसेच श्री. स्वामी समर्थ सांस्कृतिक मंडळाने वैजापूर भूषण पुरस्काराने सन्मानित केलेले डॉ. व्ही.जी.शिंदे यांना शुक्रवार रोजी देवाज्ञा झाली.त्यांच्या पार्थिवावर शनिवार (ता.१३) रोजी सकाळी दहा वाजता येथील अमरधाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले व एक विवाहित मुलगी असा परिवार आहे.कै.शिंदे मूळचे बीड जिल्ह्यातील रहिवाशी पण गेल्या साठ वर्षापासून ते वैजापूरात राहत आहेत. या प्रसंगी आ,रमेश पा. बोरनारे, नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, कोपरगावच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे,बिपीन कोल्हे,माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर, भाऊसाहेब ठोंबरे, ऍड.प्रमोद जगताप, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, साबेरखान, सौ.आनंदीताई अन्नदाते अखिल शेख,प्रशांत सदाफळ, बाबासाहेब जगताप,आ,विवेक कोल्हे,देविदास वाणी, राजेंद्र पा. साळुंके, पारस घाटे, कल्याण जगताप,प्रकाश बोथरा, विशाल संचेती,घनश्याम वाणी, रही म शेख,डॉ.एस.एम.जोशी, डॉ.राजीव डोंगरे,दशरथ बनकर,प्रशात कंगले,राजेश गायकवाड,दिनेश राजपूत, जफरखान, ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत,रामहरी जाधव,प्रकाश चव्हाण,डॉ.संतोष गगवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली.कै.डॉ .शिंदे येथील कै.लालाबिंदा प्रसाद वस्तीगृहाचे अध्यक्ष ही होते. त्यांनी वैजापूर पाट पाणी संघर्ष समितीत ही सक्रिय सहभाग घेतला होता.कोपरगाव,श्रीरामपूर,गंगापूर,संभाजीनगर,नाशिक ,बीड येथील नागरिक ही अंतविधित सहभागी झाले होते.



## मच्छिंद्रनाथ मंदिर येथे सामूहिक सत्यनारायण पूजन



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- श्री स्वामी मच्छिंद्रनाथ मंदिर, मिटमिटा येथे अधिक मास प्रीत्यर्थ दिनांक १३.०६.२६ शनिवार रोजी आयोजित सामूहिक सत्यनारायण पूजेसाठी भाविक , भक्त उत्साहाने सहभागी झालेत. संपूर्ण अधिक महिन्यात पवमान अभिषेक, लघुरुद्र , श्रीमद् भागवत सप्ताह आणि सामूहिक सत्यनारायण पूजा आदी धार्मिक कार्यक्रम मच्छिंद्रनाथ मंदिर मिटमिटा येथे पार पडलेत.

## मंगळवारी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सुचना प्रौद्योगीकी संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि.१६ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सुचना प्रौद्योगीकी संस्थान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे हा मेळावा होणार आहे.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. त्यात सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि., बजाज ऑटो लिमिटेड, संजिव ऑटो पार्ट्स मॅन्यूफॅक्चरींग प्रा. लि., मेटलमन ऑटो लि., यशश्री प्रेस कॉम्प्स प्रा.लि., औरंगाबाद ऑटो ॲन्सीलरी प्रा.लि. वाळूज, स्टरलाईट टेक्नोलॉजी लिमिटेड, ग्रीव्हज कॉटन लिमिटेड,, व्हर्लपूल ऑफ इंडिया लिमिटेड, एल ए पि एल ॲटोमोटिव लिमिटेड, ग्रोमेट सर्व्हिसेस प्रा.लि., बीजी-लीइन इलेक्ट्रीकल्स लि., गरवारे हायटेक प्रा.लि., रेहेल्को कंपनी, रत्नप्रभा मोटर्स, व्हेरॉक इंजिनिअरिंग लिमिटेड, एस एस कंट्रोल, वाळूज, साई मॅनपावर सर्व्हिसेस प्रा.लि., अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिसेस, अभिनव इंस्टीटयूट ऑफ टेक्नोलॉजी, नेक्स्लीड कंन्सल्टींग प्रा.लि., एक्सेल प्लेसमेंट, हेडहंटर्स, जय इंटरप्रायझेस, एस डब्ल्यू मल्टीमिडिया, यशस्वी अकॅडमी फॉर स्कील्स, नरसिम्हा इंडस्ट्रीअल ट्रेनींग अँड प्लेसमेंट लि. अशा विविध २७ आस्थापना कडून ३४१५ रिक्तपदे प्राप्त झाली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत घेणार आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींसाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या २७ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदांसाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. गरजू युवक युवतींनी मेळाव्यास उपस्थित राहून मुलाखती देऊन रोजगार संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहायक आयुक्त राजू वाकडे यांनी केले आहे.

# पिंपळे सौदागर येथे महाआरती उत्साहात

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीच्या तपपुर्ती निमित्त येथील पवना काठावरील श्री दत्त आणि देवी मंदिरांमध्ये महाआरती करण्यात आली. गुरुवार दि. ११ रोजी सायंकाळी झालेल्या या पवित्र सोहळ्याचा प्रारंभ प्रणिता अवधूत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या शंखनादाने झाला. परिसरातील नागरिक आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या सोहळ्याला पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, नगरसेविका अनिता काटे, जयनाथ काटे, भरत काटे, संदेश काटे, संजय भिसे, संदिप काटे, कैलास काटे, मनोज ब्राह्मणकर, प्रविण कुंजीर, बाळासाहेब परघळे, आबा पांढरे, अशोक वारकर, बाळकृष्ण चौधरी, प्रेमलाल लांजेवार, पांडुरंग कांबळे, विलास नगरकर तसेच ज्येष्ठ नागरिक,महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना शत्रुघ्न काटे यांनी पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी नागरिकांनी परिसरात वृक्षारोपण करावे तसेच झाडांच्या संवर्धनासाठी देखील प्रयत्न करावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन मनोज ब्राह्मणकर यांनी केले. महाआरती नंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.



## श्री क्षेत्र जैनगिरी येथे अमावस्या निमित्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- शहरापासुन १२ कि.मी.अंतराव असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थानअसलेले श्री.१००८ संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक १५ जुन सोमवार २०२६ सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे.

आचार्य सिद्धांत सागर महाराज ससंघ सानिध्य प्राप्त होनार आहे यावेळी आचार्यश्री चे प्रवचन व पादपक्षालन होनार आहे यावेळी उपस्थित समाज बांधवांना ११ ते २ दरम्यान श्रीमती शंकुतलाबाई रमनलालजी बाकलीवाल पाचोडवाला यांचा प्रेरनेने श्रीमती रीनादेवी शीतलकुमारजी प्रवेश नमन बाकलीवाल परीवार पाचोडवाला व छाबडा परीवार छत्रपती संभाजीनगर यांचा वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे. अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा होवुन भगवंताची आरतीही करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्त मंडळातर्फे केले आहे.